महाराष्ट्र शासन

क्र. एनजीसी २००२/नमवि/(०१/२००२)/मशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : १५ जुलै, २००२.

प्रति,
कुलसचिव,
पुणे विद्यापीठ,
पुणे

विषय : कायम विना अनुदान तत्वावर नवीन महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत..

संदर्भ : कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे यांचे पत्र क्र. सीए/५३/८३, दिनांक २८.१२.२००१.

महोदय,

आपल्या विद्यापीठामार्फत सन २००२-२००३ या शैक्षणिक वर्षासाठी नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांमध्ये मांडके ह्युमन हॅपिनेस फाऊण्डेशन, मांडके चेंबर, ४७/८, एरंडवण, पौड रोड, पुणे-३८ या संस्थेस पौड रोड, पुणे या ठिकाणी कला, वाणिज्य व विज्ञान बी.सी.एस. (महिला) या विद्याशाखांचे महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी मिळण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. सदर प्रस्ताव विचारात घेऊन मांडके ह्युमन हॅपिनेस फाऊण्डेशन, मांडके चेंबर, ४७/८, एरंडवण, पौड रोड, पुणे-३८ या संस्थेस पौड रोड, पुणे या ठिकाणी विद्यार्थ्यांचा उच्च शिक्षणाकडे वाढत असलेला ओढा विचारात घेऊन सन २००२-२००३ या शैक्षणिक वर्षापासून कला, वाणिज्य व विज्ञान बी.सी.एस. (महिला) या विद्याशाखांचे महाविद्यालय सुरु करण्यास कायम विना अनुदान तत्वावर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, १९९४ मधील कलम ८२(५) व कलम ८२(५) चे परंतुक यानुसार पुढील अटींच्या अधिन मान्यता देण्यात येत आहे.

१) सदर संस्थेने कायम विना अनुदान तत्वावर महाविद्यालय चालविण्यास तयार असल्याबाबतचे हमीपत्र सादर केले नसल्यास सदर हमीपत्र संस्थेकडून घेण्यात यावे. संस्था हमीपत्र देण्यास तयार नसल्यास तसे शासनास कळवावे व शासनाचे आदेश विद्यापीठाने प्राप्त करुन घ्यावेत.
२) सदर महाविद्यालयास दिलेली मान्यता ही कायम विना अनुदान तत्वावर असून या महाविद्यालयास भविष्यात कोणत्याही प्रकारचे अनुदान किंवा आर्थिक मदत शासनाकडून देण्यात येणार नाही.

TRUE COPY

प्राचार्य
श्रीमती सुमताई मांडके
महाविद्यालय (वाणिज्य)
पुणे-४११ ०३८

15

३) या महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या आर्थिक बाबींसंबंधीची सर्वस्वी जबाबदारी स्वीकारणे संस्थेवर बंधनकारक आहे.

४) प्राध्यापक एन.डी.पाटील समितीच्या अहवालानुसार राज्यातील सर्व महाविद्यालयांच्या शैक्षणिक शुल्काबाबत मंत्रीमंडळ जो निर्णय घेईल त्यानुसार या महाविद्यालयातील शुल्क आकारणी करण्यात यावे. तोपर्यन्त कायम विना अनुदान तत्वावर संस्थेस महाविद्यालय आर्थिकदृष्ट्या चालविणे शक्य व्हावे, यासाठी संस्थेने विद्यार्थ्यांकडून किती शुल्क आकारावे, हे विद्यापीठाकडून मंजूर करुन घ्यावे.

५) या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना इ.बी.सी.सवलत लागू होणार नाही.

२. सदर महाविद्यालयाने वरील सर्व बाबींची पूर्तता केल्यास त्या अधिन महाविद्यालयास संलग्नीकरण देण्याबाबत विद्यापीठाने कार्यवाही करावी व आपला अहवाल संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे तथा विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना सादर करावा.

आपली,

(सही)

(अं. अ. कारखानीस)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत -
१) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे.
३) अध्यक्ष/सचिव, मांडके ह्युमन हॅपिनेस फाऊंडेशन, मांडके चेंबर, ४७/८, एरंडवणा, पौड रोड, पुणे-३८.
४) मा. मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
५) मा. उप मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
६) मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
७) मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
८) निवडनस्ती/मशि-३

C:\My Documents\sc3\New Colleges 2002-03\New Colleges 2002-03 order PUNE UNI.doc

प्राचार्य
श्रीमती सुधाताई मांडके
महाविद्यालय (वाणिज्य)
पुणे-४११ ०३८

SMT. SUDHATAI MANDKE COLLEGE
ID No. PU/PN/ASC/178(2002)
PUNE-38

CS Scanned with CamScanner